जलविद्युत प्रकल्पासह मोठया/मध्यम/पाटबंधारे प्रकल्पाच्या शीर्षकामाच्या सर्वसाधारण आराखड्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण-११०४/(४९९/२००४)/मं.प्र.१
दिनांक.- ८/१२/२००४.

संदर्भः- (१) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००१/६२/(६३०/२००१)/मो.प्र.२,
दिनांक १५.११.२००१.

पाटबंधारे विभागांतर्गत मोठया / मध्यम / लघु / जलविद्युत प्रकल्पांचे संकल्पन व संकल्पचित्रे तयार करण्यासंदर्भातील पध्दती याबाबत शासन आदेश मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक व क्षेत्रीय अधिका-यांना वेळोवेळी देण्यात आलेले आहेत.

जलविद्युत प्रकल्पासह मोठया पाटबंधारे प्रकल्पांच्या शीर्षकामाचा सर्वसाधारण आराखडा, संकल्पन व संकल्पचित्रे यास मान्यता देण्याचे अधिकार महामंडळ कार्यालयातील मुख्य अभियंता स्तरावर देण्यात येत आहेत. ज्या महामंडळ कार्यालयात "मुख्य अभियंता" हे पद नसेल त्या महामंडळाच्या संबंधीत क्षेत्रीय मुख्य अभियंता स्तरावर ही मान्यता देण्यात यावी.

वरील निर्णयाच्या अनुषंगाने महामंडळाच्या अधिनियमात अनुरुप बदल करण्याची कार्यवाही शासनातर्फे यथावकाश करण्यात येईल. नेहमीप्रमाणे बाहेरील संस्थानी मागणी केल्यास मोठया, मध्यम, व लघु प्रकल्पांची किंवा त्यांचे घटक यांची संकल्पने शासनाच्या मान्यतेनंतर सल्लामसलत तत्वावर तयार करण्यात अथवा तपासण्यात यावीत. वार्षिक संकल्पन कार्यक्रमास मुख्य अभियंता (द.व.प्र.) व स.स. हे मान्यता देतील. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या अधिका-यांनी व क्षेत्रीय अधिका-यांनी वरील आदेश लक्षात घेऊन संकल्पने व संकल्पचित्रे तयार करण्यासंदर्भात उचित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(भ. तु. रेडकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत:

- कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
- कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
- कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
- कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
- कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
- प्रधान सचिव (पा.),जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मुख्य अभियंता (जसं). व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- जलसंपदा विभागातील सर्व तांत्रिक कार्यासने.
- सर्व उप अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
- मो.प्र.१ कार्यासन, संग्रहार्थ.
- निवडनस्ती (मो.प्र.१) कार्यासन.

C.M.P. 1 Gen GR 499.04.doc Asolo/08-12-04